Rotary Badlapur Industrial Area

UNITE FOR GOOD

TiTEN

CLUB E- BULLETIN -ROTARY CLUB OF BADLAPUR INDUSTRIAL AREA

MONTHLY ISSUE - October 25 Dist.: 3142 • Club Id: 53964




RTN. AMIT PADHYE
CLUB PRESIDENT
2025-2026

RTN. SANTOSH BANE
CLUB SECRETARY
2025-2026

RTN. SATISH SALVANKAR
BULLETIN EDITOR
2025-2026

# Perfect Year 2018 - 19



-By Perfect President
Rtn. Mohan Karmarkar

आज अचानक सात वर्षांपूर्वीच्या आठवणींना उजाळा देण्याचा प्रयत्न करतोय. खरं सांगायचं तर मला त्यावर्षी प्रेमाने समजावून पकडून अंबरनाथच्या नक्षत्र हॉटेलच्या अमर्याद ब्रेकफास्टच्या मोहात RCBIA चा अध्यक्ष करण्यात आलं. मला जबाबदाऱ्या घेण्याची आवड होती. पण त्यावेळी माझा बराच वेळ KEM नोकरी आठ तास, प्रवास हे तीन तास, बदलापूर ला रसाली फार्मा जीवक हे व्यवसाय, माझं LLM शिक्षण व घरी दोन छोटे नातू व व्याही मंडळी यांच्यात कसा जात असे याचा तुम्हीच विचार करा. त्यात घेतलेली RCBIA ची जबाबदारी.

पण परमेश्वराने सर्व काही पार पाडून घेतले. माझ्या आदल्यावर्षी नितीन महाजन अध्यक्ष होते. त्यांच्या वर्षी खूपच छान काम झालेलं. त्यामुळे माझ्यावरची जबाबदारी खूपच वाढली होती. प्रोजेक्टची संख्या व TRF कॉन्ट्रीब्युशन चे भरपूर टेन्शन होते.

पण परमेश्वर नुसत्या जबाबदाऱ्या नाही तर त्यासोबत माणसं पण पाठवतो. रोटरी फॅमिलीचा खरा  प्रत्यय त्यावेळी आला.

Rotary Badlapur Industrial Area

UNITE FOR GOOD

TiTEN

श्री राजीव दिवाण बदलापुरात आले होते. ते सेक्रेटरी होण्यास तयार झाले व कपिल पढेर खजिनदार. नितीन महाजनांनी वर्षभर मला भरपूर मदत केली. आणि इतर सीनियर मित्र पण नेहमीच मदतीला धावत (पराग पोतनीस, नितीन महाजन, नितीन चोणकर, हेमंत पारसकर, विद्या राठोड व डॉ. सविता आणि योगेंद्र जावडेकर).

माझ्या कार्यकाळात पाच-सहा जुने मेंबर्स क्लब सोडून गेले व ऑफिसची जागा ही बदलावी लागली. पण ’तो’ पाठीशी सदैव होता. नवीन जागा ऑफिससाठी मिळाली व नवीन मेंबर्स पण... त्यातले एक यंदाचे अध्यक्ष श्री अमित पाध्ये.

नेहमीचे प्रोजेक्ट व्यवस्थित पार पडले. ५२ आठवड्यांच्या ५२ मीटिंग्स झाल्या. माझ्या इन्स्टॉलेशन साठी PDG डॉ. मोहन चंदावरकर आले. तो माझा KEM मधला जुना मित्र.... OCVसाठी डीजी डॉ. अग्नेश गांगुळींची शाबासकी व सर्व रोटरी परिवारानी वर्षभर मनापासून केलेला सहभाग व मदत... मी सर्व रोटरी परिवाराचा अत्यंत ऋणी आहे.

त्याकाळी मला व्यवहार जास्त मित्रता कमी असं क्लबचं वातावरण असायचं असं वाटायचं. पण त्यानंतर आता वातावरण खूप छान आहे असं अनुभवाला मिळतंय. RCBIA च्या परिवारास यशाची चढती कमान लाभो व त्यांना जगभर कीर्ती लाभो ही प्रार्थना.

Rotary
Badlapur Industrial Area

UNITE FOR GOOD

# TRF Contribution

| Member Name | Amount |
|---|---|
| Rtn. Shakti Ramkrishna | Rs.30,000 |
| Rtn. Ujwala Chonkar | Rs.29,750 |
| Rtn. Santosh Bane | Rs.29,750 |
| Rtn. Mohan Karmarkar | Rs.29,750 |
| Rtn. Amit Padhye | Rs.28,000 |
| Rtn. Sachin Shanbhag | Rs. 8,500 |
| Rtn. Hemant Paraskar | Rs. 8,500 |
| Rtn. Savita Jawadekar | Rs. 8,500 |
| Rtn. Yogendra Jawadekar | Rs. 8,500 |
| Rtn. Vinod Jade | Rs. 8,500 |
| Rtn. Shakuntala Churi | Rs. 8,500 |

# आताची पेरणी, उद्याचं यश

-By Rtn. Parag Potnis

आपल्या क्लबचे नाव दोन्ही डिस्ट्रिक्ट मध्ये खूपच आदबीने घेतलं जातं कारण आपण आपला दबदबा त्यांच्यापर्यंत पोहोचवला आणि आपली दखल घ्यायला लावली. चार्टर मेंबर म्हणून माझ्या मनात आलेल्या प्रश्नांच्या उत्तरासाठी हा लेख लिहिला आहे.

2000 साली फक्त 27-30 लोकांनी चालू केलेला हा क्लब आज 60 मेंबर्स चा टप्पा ओलांडून गेलाय. आजच्या विषयाला हात घालण्यापूर्वी थोडे मागे जाऊया, कपिल, वैभव, ह्या दोघांनी आपली वर्षे अतिशय जोशात पार पाडली, इतक्या वर्षाचा अनुभव पणाला लावून दोघांनी व मेंबर्स ची अचूक पारख करत चार चांद लावले, ह्या दोघांनी जी modus operandi वापरली तीच आपल्या येणाऱ्या प्रेसिडेंट ना उपयोगी पडणार आहे. प्रत्येक मेंबर हा कधी न कधी प्रेसिडेंट बनणार च आहे किंवा नक्की बना.

**Presidentship is not a burden but it is a earned satisfaction of fulfillment.**

आपल्या क्लब च्या मेंबर्स चा बॅलन्स हा बऱ्यापैकी तरुणाई कडे झुकलाय, तरुणांच्यात बदल घडवायची ताकत, कुवत आणि तयारी ठासून भरली आहे त्याचा वापर करा आणि आपले Presidential वर्ष आत्ताच ठरवा, तुम्ही तुमच्या कामा निमित्त फिरता, देशाबाहेर सुद्धा जाता, त्या लोकांना बोलतं करून आपल्या क्लब साठी मटेरियल जमवा, त्यांचे प्रोजेक्ट बघून त्याचा आपल्याला कसा उपयोग करून घेता येईल हे ठरवा आणि हे सर्व जेव्हा तुम्ही तुमच्या वर्षात प्रत्यक्षात उतरवाल तेव्हा प्रोजेक्ट पूर्ण झाल्याचे समाधान काय असते ते तुम्हाला कळेल.

Rotary
Badlapur Industrial Area

UNITE FOR GOOD

TITEN

बघा प्रेसिडेंट तर व्हाचंच आहे मग कोणीतरी जबरदस्तीने घोड्यावर बसविण्यापेक्षा आपणहून अबलख वारू वर स्वार होऊन अटकेपार झेंडे लावू. आत्ताच तुमचे वर्ष ठरवा, तुमच्या मधाळ वाणीने आपले मेंबर आपलेसे करून घ्या त्यांच्यातील सुप्त गुण शोधून काढा. इतकी वर्षे गाठीशी असलेला अनुभव पणाला लावा आणि व्हा घोड्यावर स्वार.
आपल्या क्लब मधील fellowship इतकी स्ट्राँग आहे की जी इतर कोणत्याही क्लब मध्ये आढळत नाही. आपण सगळे जण क्लब च्या हितासाठीच झटत असतो, आपला इगो बाजूला ठेऊन क्लब च्या प्रत्येक प्रोजेक्ट मध्ये जमेल तसे आणि जमेल तेव्हा हातभार लावतो व प्रोजेक्ट यशस्वी करतो. मला कोणाशीही comparision करायची नाही, आपला होणार प्रत्येक प्रेसिडेंट हा self-made ch असणार आहे आणि त्याचे वर्ष तो ठरवेल आणि नक्कीच गाजवून सोडेल ही मला खात्री आहे.
नेतृत्वातील बदल हा नेहमीच हवाहवासा वाटतो आणि तरुण नेतृत्व तर अजुन खुलून दिसतं, आपल्या सर्व तरुण मेंबर्स ना माझी कळकळीची विनंती आहे की हे बौद्धिक नाही पण मनात आलेले विचार आहेत, हेच विचारांचे पिल्लू तुमच्या डोक्यात आज सोडलंय, आपला क्लब जो सध्या उत्तुंगपणाचे बिरुद भूषवतोय ते तसेच कायम ठेवण्यासाठी आपल्याला काय करता येईल ह्याचा शांत डोक्याने विचार करा, त्यासाठी तुम्हाला केलेलं हे आवाहन आहे असे समजा.
आपल्या क्लब ला लाख लाख शुभेच्छा व होणाऱ्या पुढच्या सर्व प्रेसिडेंट ना माझा 24/7 मदतीचा हात पुढे करतो.

Rotary
Badlapur Industrial Area

UNITE FOR GOOD

TiTEN

# Eco-Friendly Ganesh Idol Immersion







**Date: 2 September 2025**
**Venue: Katrap Lake, Panvel Highway, Badlapur (East)**

As part of a joint initiative by Rotary clubs, 22 POP Ganesh idols were immersed in an environmentally responsible manner at Katrap Lake, Badlapur. The project aimed to reduce water pollution during Ganesh visarjan and promote sustainable practices. Informative leaflets were distributed to devotees, raising awareness about the importance of eco-friendly celebrations and preserving natural water bodies.

| Man Hrs | Benefeciaries | Members |
|---|---|---|
| 15 | 25 | 3 |

# Nirmalya Collection Drive



**Date: 2 September 2025**
**Venue: St. Anthony School, Badlapur**

Interact Club of St. Anthony High School, in collaboration with the Rotary Club's Save Our Rivers campaign, organized the NIRMALYA Collection Project to promote eco-friendly Ganesh celebrations. Students collected floral offerings (nirmalya) from home to prevent river pollution, spreading the message: "Let little hands join to protect our rivers."



| Man Hrs | Benefeciaries | Members |
|---|---|---|
| 50 | 100 | 50 |



# Health Awareness & Sanitary Pad Distribution




**Date: 10 September 2025**
**Venue: Shri Swami Vivekanand School/College, Khanapur, Belgaum**

Under the banner of Rotary Club of Badlapur Industrial Area, Rtn. Dr. Priyanka Jain conducted a health awareness program in her native place, focusing on menstrual hygiene. The initiative reached 100 students, with the distribution of 500 sanitary pads. This project aimed to educate young girls on menstrual health, break taboos, and promote dignity and confidence through awareness and access to basic hygiene resources.





| Man Hrs | Benefeciaries | Members |
|---|---|---|
| 10 | 100 | 1 |

Rotary
Badlapur Industrial Area

UNITE FOR GOOD

TiTEN

# Inspiring Futures: Career Guidance Lectures







**Date: 11 September 2025**
**Venue: Vidya Mandir School, Shivale village**

Two impactful career guidance sessions were conducted at Vidya Mandir School, Shivale village near Murbad, benefiting senior students at a crucial stage of their academic journey. The sessions offered insights into various career paths, helping students make informed choices about their future. The initiative received an overwhelming response from both students and teachers, highlighting the need for continued educational support in rural areas.

| Man Hrs | Benefeciaries | Members |
| --- | --- | --- |
| 6 | 100 | 2 |

Rotary Badlapur Industrial Area

UNITE FOR GOOD

TiTEN

# Guiding Young Minds : Career Guidance Session







**Date: 12 September 2025**
**Venue: Don Bosco School, Badlapur West**

On behalf of RCBIA, a career guidance lecture was conducted at Don Bosco English School, Badlapur West, for nearly 150 enthusiastic 10th-grade students. The 90-minute session received an overwhelming response from both students and teachers, sparking curiosity and meaningful conversations around careers in the share market and engineering. Post-session, many students interacted personally to seek further guidance.

| Man Hrs | Benefeciaries | Members |
|---|---|---|
| 6 | 150 | 2 |

Rotary Badlapur Industrial Area

UNITE FOR GOOD

TiTEN

# Punjab Flood Relief Program





**Date: 13 September 2025**

We're proud to share that the Interact Club of St. Anthony High School actively participated in a relief collection drive for flood-affected families. Items such as biscuits, water bottles, mats, blankets, clothes, and 80 grocery kits from our club were sent to the district today, reflecting the spirit of compassion and service among our youth.







| Man Hrs | Benefeciaries | Members | Interactors |
|---|---|---|---|
| 235 | 1000 | 7 | 75 |

# Guiding Young Minds : Career Guidance Session







**Date: 15 September 2025**
**Venue: Bal Vikas Vidyalaya, Badlapur East**

On September 15, a career guidance lecture was conducted on behalf of RCBIA for around 110 students of 10th standard at Bal Vikas Vidyalaya, Badlapur East. The session aimed to help students explore various career paths and make informed decisions about their future. As with previous sessions, the lecture was very well received by both students and teachers, sparking thoughtful questions and enthusiastic participation.

| Man Hrs | Benefeciaries | Members |
|---|---|---|
| 5 | 120 | 2 |

Rotary Badlapur Industrial Area

UNITE FOR GOOD

TiTEN

# Celebrating Engineers on Engineer's Day

**Date: 17 September 2025**
**Venue: Rotary Office**

On the occasion of Engineer's Day, Club proudly felicitated the engineers among our members, honoring their valuable contributions and dedication. The event celebrated their role in building a better community through innovation and service.





| Man Hrs | Benefeciaries | Members |
|---|---|---|
| 50 | 15 | 100 |







Rotary
Badlapur Industrial Area

UNITE FOR GOOD

10 TiTEN

# Guiding Young Minds : Career Guidance Session



**Date: 18 September 2025**
**Venue: Janata Vidyalaya, Dhasai**

On behalf of RCBIA, two impactful career guidance sessions were held at Janata Vidyalaya, Dhasai, engaging nearly 110 students from 10th standard and 85 from 12th standard. Despite being from a rural background, students showed great enthusiasm and curiosity about their future careers. Many approached Rtn. Sudhir Madke, Rtn. Ashish Potnis, and the team to clarify their doubts.





| Man Hrs | Benefeciaries | Members |
| --- | --- | --- |
| 5 | 205 | 3 |

Rotary Badlapur Industrial Area

UNITE FOR GOOD

TiTEN

# Eye Check-up Camp



**Date: 23 September 2025**
**Venue: Mahaganpati Temple, Badlapur West**

RCBIA organized a free eye check-up camp benefiting 50 patients from the local community. During the camp, 15 individuals were diagnosed with cataracts and operated for same. The initiative aimed to promote early detection and improve eye health among underserved sections of society.





| Man Hrs | Benefeciaries | Members |
| --- | --- | --- |
| 15 | 50 | 5 |

Rotary
Badlapur Industrial Area

UNITE FOR GOOD

TiTEN

# NAVADURGAA – Girls Self-Defense Training







**Date: 23 September 2025**
**Venue: Balvikas School**

**Club First Lady's Dream Project**
As part of the NAVADURGAA initiative, RCBIA conducted a self-defense training session or girls of grades 8 to 10. Led by Anamika, a student of Manisha Garwalia, the session included practical demonstrations to help young girls build confidence and face challenges boldly. The event received enthusiastic participation from students and support from the staff.

| Man Hrs | Benefeciaries | Members |
|---|---|---|
| 6 | 120 | 2 |

Rotary Badlapur Industrial Area

UNITE FOR GOOD

TiTEN

# Replacement of Kitchen Sheds

**Date: 24 September 2025**
**Venue: Zilla Parishad School**



Replacement of Kitchen Shed Sheets at Zilla Parishad School Dharol The sheets on the kitchen shed at Zilla Parishad School, Dharol had deteriorated. They had rusted and started to leak. With the support of Rotary Club Badlapur Industrial Area's past president, Hon. Mr. Kapil Padher, and the school's Headmaster, Mr. Shewale, all the old sheets on the kitchen shed were replaced with new sheets today.

| Man Hrs | Benefeciaries | Members |
|---|---|---|
| 4 | 500 | 2 |

Rotary Badlapur Industrial Area

UNITE FOR GOOD

10 TiTEN

# Health Camp & Sanitary Pan Distribution







**Date: 24 September 2025**
**Venue: Pimploli School**

A health camp was organized at Pimpaloli School, benefiting 60 girl students. Rotarians Kapil Padher and Veena Padher generously donated 500 sanitary pads to support menstrual hygiene in this rural school. The initiative will help reduce absenteeism among girls. This thoughtful effort reflects the club's ongoing commitment to health and education.

| Man Hrs | Benefeciaries | Members |
|---|---|---|
| 15 | 70 | 5 |

# Women's SHG
# Loan Guidance Program








**Date: 25 September 2025**
**Venue: Pimploli School**

Loan guidance session for women's self-help groups was conducted with great success. Rotarian Satish Mane delivered an engaging and easy-to-understand talk covering loan processes and practical business ideas suited for SHGs. His insights boosted the confidence of many women, sparking curiosity and inspiring participation. The enthusiastic involvement of all attendees made the session both impactful and empowering.

| Man Hrs | Benefeciaries | Members |
|---|---|---|
| 15 | 70 | 5 |

Rotary Badlapur Industrial Area

UNITE FOR GOOD

TiTEN

# Hygiene and Health Awareness Programme








**Date: 26 September 2025**
**Venue: Hiraji Gomaji High School and Ku. B.N.P. School No. 3**

As part of a special Navratri initiative, a health camp was conducted for girl students at Hiraji Gomaji High School and Ku. B.N.P. School No. 3, Kharvai. Dr. Ashwini Kavathankar shared valuable health knowledge and addressed students' queries with care and clarity. A total of 96 girls from Classes 6 to 10 participated in the session.

| Man Hrs | Benefeciaries | Members |
|---|---|---|
| 4 | 96 | 4 |

# Self-Defense Training







**Date: 27 September 2025**
**Venue: Hiraji Gomaji High School**

A self-defense camp was organized for students of Classes 8 to 10. Mr. Kaushik Garawali conducted the session, teaching practical self-defense techniques and guiding students—especially girls—through hands-on demonstrations. A total of 62 students participated enthusiastically in the session.

| Man Hrs | Benefeciaries | Members |
|---|---|---|
| 4 | 62 | 4 |

Rotary Badlapur Industrial Area

UNITE FOR GOOD

# Celebration with Garba & Bhondla



**Date: 27 September 2025**
**Venue: Badlapur East**

Members and their families came together to celebrate with vibrant Garba and traditional Bhondla activities. The evening was marked by fun, laughter, and cultural bonding.

| Man Hrs | Benefeciaries | Members |
|---|---|---|
| 35 | 50 | 35 |







Rotary
Badlapur Industrial Area

UNITE FOR GOOD

TiTEN

# TRF Contribution

| Member Name | Amount |
|---|---|
| Rtn. Dinesl Samel | Rs. 8,500 |
| Rtn. Vilas Wakhare | Rs.4,250 |
| Rtn. Mangesh Jadhav | Rs.4,250 |

Helping People, Changing Lives

Rotary
Badlapur Industrial Area

UNITE FOR GOOD

10 TiTEN

# Weekly Meetings

## Week 1






## Week 2






## Week 4



# Birthday Celebrations















Rotary
Badlapur Industrial Area

UNITE FOR GOOD

TITEN

# Anns Get-Together















Rotary Badlapur Industrial Area

UNITE FOR GOOD

TITEN

# खुसखुशीत शंकरपाळ्या

~ By Ann Shraddha Lawate

कृती - सर्वप्रथम १ वाटी दूध,१वाटी साजूक तूप,१ वाटी पिठीसाखर आणि चिमूटभर मीठ एकत्र करून हलके होईपर्यंत चांगले फेटून घ्यावे. त्यात अर्धाकिलो मैदा घालून पाणी न घालता मळून घ्यावे. साधारण अर्ध्या तासाने जाडसर पोळी लाटून शंकरपाळीच्या आकारात कातून घ्यावे. मध्यम आचेवर तुपात/ तेलात गुलाबी रंगावर सतत ढवळत तळून घ्यावे. जिभेवर विरघळणाऱ्या खुसखुशीत शंकरपाळ्या तय्यार आहेत.

टिप - दूध व तूप (normal tempreature) असलेले वापरावे.



# रेडीमेड रांगोळी पॅचेस

~ By Ann Shradhha Lawate











e bac

# दिवाळी कट्टा

~ By Rtn. Shalaka Mangekar











# सर्वांगी सुंदर



~ By Rtn. Ujwala Chonkar



~ By Annet Vighnesh Kandalgaonkar



~ By Annet Saavi Salvankar

# चंद्राशी साजरी रात्र

~ By Ann Akshada Padhye

विझवून आज रात्री, कृत्रिम दीप सारे ;
गगनात हासणारा, तो चंद्रमा पाहा रे !

असतो नभात रोज, तो एकटाच रात्री;
पण आजच्या निशेला, त्याच्या सवे राहा रे !

चषकातूनी दुधाच्या, प्रतिबिंब गोड त्याचे,
पाहून साजरी, कोजागिरी करा रे !

*|| कोजागिरी पौर्णिमेच्या हार्दिक शुभेच्छा ||*



Rotary
Badlapur Industrial Area

UNITE FOR GOOD

TiTEN

# मुलांची जडणघडण

~ By Rtn. Nilambari Kandalgaonkar

प्रत्येक आईवडीलांना वाटत असते की आपल्या मुलाने / मुलीने खूप शिकावं, नाव कमवावं....
पण परीक्षा यश म्हणजेच सर्व काही नाही. परीक्षा यशाबरोबरच सुदृढ शरीर, कला नैपुण्य, चांगले वागणे, नेतृत्वगुण, देशप्रेम, कृतज्ञता ( आई ,वडील, शिक्षक, निसर्ग , समाजाविषयीची ) वगैरे ह्या गोष्टीही तितक्याच महत्वाच्या असतात. पण दुदैवाने अभ्यासातील मार्कानाच महत्व दिले जाते.
खरं तर मातृभाषेतून शिक्षण घेतल्याने मुलांचा विकास होतो. ज्या देशात त्यांच्या मातृभाषेतून शिक्षण दिले जाते ते देश प्रगत आहेत. इंग्रज आपल्या देशातून निघून गेले पण त्यांच्या गुलामगिरीत आपण आहोतच. भाषेची नाळ ही त्या राष्ट्राच्या संस्कृतीशी जोडलेली असते. इंग्रजी भाषेला विरोध नसावा पण शालेय शिक्षण हे मातृभाषेतून झाले पाहिजे.
आज इंग्रजी माध्यमाच्या शाळा हा त्यांचा बिझनेस झालेला दिसून येतो. मातृभाषेतून मुलाचे शिक्षण हे आननंदायी होते.
ENGLISH IS A LANGUAGE NOT A MEASURE OF INTELLIGENCE.

इंग्रज गर्व्हनर लॉर्ड मॅकोलेने तेव्हा भारताचा अभ्यास केला. तेव्हा त्याच्या असे लक्षात आले की भारतीयांची संस्कृती संपवायची असेल तर त्यांच्यावर इंग्रजी शिक्षण लादले गेले पाहिजे. तो त्या वेळेला म्हणाला होता -
I WANT TO CHANGE INDIAN PEOPLE THOUGH THEY INDIAN BY BLOOD BUT EUROPIAN BY CULTURE.
आज आपल्याला सर्वांना हेच दिसून येत आहे.
प्राचीन भारताचा इतिहास बघितला तर त्यावेळी वेदकाळात भारत (आर्यावत हे त्यावेळचे नाव ) हा संपन्न देश होता. स्त्रियाही उच्चशिक्षित होत्या. जेव्हा आपल्या देशावर परकीय आक्रमणे झाली तेव्हा स्त्रियांच्या सुरक्षेचा प्रश्न आला त्यामुळे त्या बाहेर पडण्यावर बंधने आली. त्यांचे शिक्षण थांबले. आज आपण उच्च शिक्षणासाठी परदेशात जातो, आपल्या मुलांना पाठवतो. पण त्यावेळी दुसऱ्या देशातले लोक आपल्या देशात शिक्षण घ्यायला यायचे.
तेव्हा संस्कृत ही मुख्य भाषा होती. तक्षशिला , नालंदा विद्यापीठे होती. त्या विद्यापीठामध्ये असा एकही विषय नव्हता की ज्याचे शिक्षण नव्हते.

पण दुदैवाने भारतावर जी आक्रमणे झाली तेव्हा ती विद्यापीठे उद्ध्वस्त करण्यात आली. आपल्याकडची संपत्ती, ज्ञानही चोरले गेले. आपल्यामध्ये एकजूट नव्हती. हे सर्व लक्षात घेता आपण आतातरी शहाणे होऊया आणि भारतीय संस्कृति टिकवण्यासाठी कटीबद्द होऊया.
व्यक्ती ( मी ) सुधारली तर कुटुंब सुधारेल, कुटुंब सुधारले तर समाज सुधारेल आणि समाज सुधारला तर आपले राष्ट्र सुधारायला वेळ लागणार नाही.

🙏 राष्ट्रकल्याणमस्तु 🙏

# संस्कार

-By Rtn. Rajiv Diwan

नंदन आठ वर्षांचा होता तेंव्हा आईच्या मायेला मुकला. त्याचं पुढील संगोपन वडिलांनी आणि संस्कार आजी- आजोबांनी केले.

नंदनच्या वाढदिवसाच्या दिवशी त्याच्या बाबांनी त्याला छान कपडे घेतले, बरेच दिवस हट्ट करत असलेला, त्याला हवा होता तो स्केट बोर्ड घेतला.त्याच्या मित्र - मैत्रीणीना बोलावून घरी वाढदिवस साजरा केला. नंदन खूप आनंदात होता हे पाहून त्याचे बाबा आणि आजी- आजोबाही सुखावले. कोणत्याही परिस्थितीत नंदनला आईची उणीव जाणवू द्यायची नाही असा निर्धारच जणू तिघांनीही केला होता. पुढील रविवारी नंदनला घेऊन त्याचे बाबा, आजोबा - आजी कार मधून बाहेर पडले. नंदनला ठाऊक नव्हतं,कुठे निघालोय ते. कार हायवेवर धावत होती, मागे पळणारी झाडे, भुर्रकन पुढे जाणारी वाहने... हे सगळं पाहून नंदन आनंदाने उड्या मारत होता. हायवे नजीक असलेल्या एका हॉटेलमध्ये थांबून सगळ्यांनी नाष्टा केला आणि पुढे निघाले. थोड्या वेळाने बाबांनी कार थोड्या आडमार्गाने घेऊन, एका गेटसमोर उभी केली. कारमधून खाली उतरून बाबांनी गेटवरील सिक्युरिटीशी काहीतरी बोलणं केलं आणि परत कारमधे येऊन बसले आणि कार सुरु केली. दरम्यानच्या काळात सिक्युरिटीने गेट उघडले. कार एका झाडाखाली लाऊन सगळे खाली उतरले. कारमधून उतरल्यावर नंदनच्या नजरेला एक मोठा फलक दिसला " मायेची पखरण " आणि समोरच्या पटांगणात वेगवेगळ्या खेळात मग्न असलेली मुले - मुली...!!!

तेवढ्यात एक बाई समोर आल्या आणि " नमस्कार, मी संस्था प्रमुख.आपण ऑफिस मधे बसून बोलू." नंदनला घेऊन सगळे ऑफिस मधे जाऊन बसले. ओळख- पाळख झाल्यावर संचालिका बाईंनी एका मावशींना बोलावून नंदनला मुलांशी गाठभेट घालून देऊन संस्थेचा परिसर दाखवायला सांगितला.

जवळपास तासाभराने नंदन मावशीं बरोबर परत आला. संचालिका बाईंनी विचारले " काय मित्र- मैत्रीणी आवडल्या का?" नुसतं मानेनेच "हो " म्हणून नंदन गप्प बसला. निघताना बाईंनी बाबांनी दिलेल्या चेक ची रितसर पावती दिली. नंदन ने बाईंना, मावशींना खाली वाकून नमस्कार केला. सगळेजण कारमध्ये बसून परत यायला निघाले. येताना हसत- खिदळत असणारा नंदन आता मात्र गप्प होता. एकदम म्हणाला " बाबा, मला मागे आजी कडे जायचंय " बाबा हो म्हणाले ,तसा नंदन पुढील सीटवरून मागे जाऊन बसला.

थोडावेळ गेला. नंदन आजीच्या कुशीत शिरून मुसमुसू लागला, आजीनं विचारलं," काय झालं नंदूबाळा?" "आजी,अनाथ म्हणजे काय गं?" त्याच्या ह्या प्रश्नावर आजी- आजोबा एकदम आश्चर्यचकित झाले." का रे ? त्या शाळेत तुला कोणी काही बोललं का" "हो, आजी, मी त्या मुलांबरोबर खेळताना मी त्यांना त्यांच्या आई- बाबांबद्दल विचारलं तर म्हणाले आम्ही अनाथ आहोत."

Rotary Badlapur Industrial Area

UNITE FOR GOOD

TiTEN

" नंदू बाळा, अरे काही मुलांचे आई- बाबा देवाघरी गेले असतात. किंवा त्यांचा सांभाळ करायला आजी- आजोबा नसतात." " मला आई नाही पण तू,आजोबा,पपा मला इतकं प्रेम देता कि आई नाही ते जाणवतंच नाही. त्या सगळ्या मुला- मुलींना आई,बाबा,आजी, आजोबा कोणीही नाहीत ना गं" आजीने नंदनच्या चेहे-या वरुन हात फिरवत म्हणाली, " अरे, अशा मुलांच्या कडे देवबाप्पा लक्ष ठेवून असतो." तेवढ्यावर नंदनच्या बाल मनाचं समाधान झालं असावं असं वाटलं.

एक-दोन दिवस गेले असतील, नंदनच्या शाळेच्या मुख्याध्यापिकानी नंदनच्या बाबांना शाळेत भेटायला बोलावलं. बाबा शाळेत गेले, मुख्याध्यापिकांच्या खोलीबाहेर असलेल्या शिपायाला नाव सांगितले.शिपाई आतमध्ये जाऊन बाईंना सुचित करून आल्याबरोबर बाबांना आत बोलावले. " नमस्कार,मी नंदन..." बाबांचे बोलणे मधेच तोडत बाई म्हणाल्या, " हो,हो,ओळखलं. मी आज तुम्हाला मुद्दाम शाळेत बोलावलं. गेल्या आठवड्यात त्याच्या वर्गाला इतिहास शिकवणा-या शिक्षिकांनी नंदनबद्दल माझ्या कडे तक्रार केली. त्या तक्रारीवरुन मी त्याच्या वर्गाला शिकविणा-या इतर शिक्षकांना ही बोलावलं. सगळ्यांची पहिली तक्रार हीच कि, ब-याच वेळा नंदन खिडकीतून बाहेर पहात बसतो. पण..पण...आता ऐका...त्याच शिक्षक- शिक्षिकांची नंदनबद्दल कौतुक वजा तक्रार आहे कि, तो खिडकी बाहेर पहात असला तरीही ,त्याला सुरू असलेल्या पाठावर प्रश्न विचारला तर अचूक उत्तर देतो...

म्हणजे तो अष्टावधानी आहे .अहो, नंदन एक हुशार,तसाच खेळकर आणि आनंदी कावळा आहे, पण गेले २-३ दिवस तो एकदम शांत, कुठेतरी हरवल्या सारखा का वागतोय?" मुख्याध्यापिकांच्या ह्या वक्तव्यां वर बाबा हलकेच स्मित करत म्हणाले," नंदन मधील हा बदल तुम्हाला नकारात्मक वाटतो? " " अर्थातच, नेहमी खेळकर, दंगा करणारा मुलगा असा अचानक शांत होतो म्हणजे..!!" " चुकताहात, माफ करा, म्हणजे, with due respect to your qualification, expertise in your field, मला असं म्हणायचंय कि, your point of view is students psychology त्या अनुषंगाने तुम्ही विचार करत आहात पण मी, as I am handling my own child's mindset. घरातील एकंदरीत वातावरणा मुळे तो खूप आत्म केंद्रित झालाय, मी,माझे, मला हवं तस्सं...ही त्याची मानसिकता झाली आणि त्यातून बाहेर काढण्यासाठी मी एक प्रयोग करायचं ठरवलं. त्याला गेल्या रविवारी एका अनाथाश्रमामधे घेऊन गेलो. तिथल्या मुलांबरोबर मिसळून गेल्यावर त्याच्या लक्षात आलं असावं कि, स्वतः पलिकडे एक विश्व आहे,त्या विश्वामधे त्याच्याच वयाची मुलं- मुली आहेत ज्यांना आई-वडील किंवा इतर कुटुंबीय नाहीत तरीही ते आनंदी आहेत. आणि नंदनला ही " जाणीव " करून देणं हे माझ्यासाठी खूप मोठं आव्हान होतं आणि त्यामधे मला काही अंशी यश आलंय असं मला खात्रीनं वाटतं. नंदन मधे होणारा हा बदल माझ्या साठी सकारात्मक आणि जमेची बाजू आहे. "

" नंदन चे बाबा, तुम्ही म्हणालात ते पटतंय मला पण त्याच्या कोवळ्या मनावर हा आघात होईल असं वाटत नाही का तुम्हाला?"

" आघात?? " पुन्हा एक हलकं स्मित करून पप्पा म्हणाले," मी एक उदाहरण देतो तुम्हाला...माफ करा, उदाहरणासह स्पष्टीकरण देणं हा मराठी विषयाचा शालेय शिक्षणाचा एक भाग होता. पण माझ्या व्यवसायाच्या निमित्ताने human psychology हा माझ्यासाठी फार महत्त्वाचा मुद्दा आहे. आता आपण " आघात " हा शब्द वापरलात. एका दगडावर मोठा घण घालून त्याचे दोन किंवा अधिक तुकडे करणं त्याला " आघात " म्हणतात, पण त्याच दगडावर , छिन्नी- हातोड्याचा वापर करून मूर्ती साकारायची असेल तर हलके हलके टोकरावं लागतं. घण घातला कि, फट्टकन मोठा आवाज होतो पण छिन्नी - हातोडा आणि तो दगड यांच्या एकमेकांवर आपटण्यामुळे एक संगीत निर्माण झाल्यासारखे वाटते आणि अंतिमतः एक सुंदर मूर्ती साकार होते. मुलांच्या वरील संस्कार ही असेच करावे लागतात . मी तुम्हाला फक्त उदाहरणासह स्पष्टीकरण दिलं, खरंतर तुम्ही एक गुरु आणि आई आहात. माफ करा लहान तोंडी मोठा घास ..."
हे स्पष्टीकरण ऐकून मुख्याध्यापिका म्हणाल्या," नाही, नाही,एकदम पटलं मला, नंदनचे बाबा, मी एक शिक्षिका आणि आई असूनही जे माझ्या कडून प्रत्यक्षात उतरलं नाही त्याची जाणीव तुमच्या कडून झाली. पण तरीही एक अंधूक शंका माझ्या मनात आहेच. नंदनला आजच्या मानसिक स्थितीतून कसे बाहेर काढणार??"

Rotary Badlapur Industrial Area

UNITE FOR GOOD

TiTEN

पुन्हा एक स्मित हास्य करत पप्पा म्हणाले " every action has a reaction हा न्युटनचा नियम ठाऊक असेलच. तुम्हाला एक विनंती करू का? नंदन च्या वर्गातील इतर विद्यार्थ्यांना विचारा.. " गेल्या आठवड्यातील झालेल्या वेगळ्या घटनेचे वर्णन करा " आणि वर्गात काय घडतंय ह्याचा feedback द्या. " नंदनच्या बाबांचा confidence पाहून मुख्याध्यापिकांनी त्यांची विनंती मान्य केली. त्याच आठवड्याच्या अखेरीस म्हणजे शनिवारी मुख्याध्यापिका स्वतः त्या वर्गात गेल्या आणि विद्यार्थ्यांना गेल्या आठवड्यात तुमच्या आयुष्यात घडलेल्या वेगळ्या घटनेचे वर्णन करा.

मुलांनी त्यांचे वेगवेगळे अनुभव सांगितले, नंदनने ही आपला अनुभव सांगितला आणि सगळ्या मित्रांना विचारले, तुम्ही सुद्धा भेट द्या त्या आश्रमाला.." रविवारी मुख्याध्यापिकांनी नंदनच्या बाबांना फोन केला, " नमस्कार, तुम्ही सांगितल्या प्रमाणे मी स्वतः नंदनच्या वर्गात जाऊन प्रयोग केला. आणि न्युटनचा नियम खोटा ठरला हो...for Nandan's action there was no reaction....but was good response..!! ब-याच मुलांना त्या आश्रमाला भेट द्यायला आवडेल." नंदनच्या बाबांना ही आनंद झाला ते म्हणाले," धन्यवाद. म्हणजे न्यूटनच्या नियमातील दुसरा टप्पा इथे लागू झाला.

An object remains motionless unless and until a force is applied, then it moves in the direction in which the force works.

आणखी एक विनंती करु का? येत्या पालक सभेत सर्व पालकांना विनंती करा कि, येणारी दिपावली तुमच्या मुलांना घेऊन त्या अनाथाश्रमामधे साजरी करा." मुख्याध्यापिकांनी ही संकल्पना ही मान्य केली आणि पालक सभेत प्रस्ताव मांडला. अर्थातच Every action has reaction हा नियम थोड्या प्रमाणात इथे सिध्द झाला तरीही काही जणांकडून response आल्याने, काही शिक्षक, पालक,पाल्य आणि अर्थातच नंदनचे बाबा,आजी -आजोबा दिवाळीमध्ये आश्रमात गेले. नंदनच्या बाबांनी आश्रम प्रमुखांना कल्पना देऊन ठेवली होती. सर्वांनी मिळून आश्रमातील मुला-मुलींना नवीन कपडे भेट दिले, फराळ वाटप केलं, फटाके उडवले..नंदन अगदी सगळ्या कार्यक्रमात आनंदाने बुडून गेला होता. दिवस आनंदात गेला. मला न्युटनच्या नियमाचा तिसरा टप्पा इथे लागू झाला असं वाटलं.

An object at rest remains at rest, and an object in motion remains in motion at constant speed and in a straight line unless acted on by an unbalanced force.

परत निघताना नंदन, त्याचे मित्र - मैत्रीणी आणि आश्रमातील मुले यांच्या डोळ्यात फुललेले आनंदाचे फुलबाजे आणि मनात तेवल्या गेलेल्या मित्रत्वाच्या ज्योतीने सर्वांची दिपावली आनंदी,सुखा समाधानाची झाली... तशीच तुम्हा सर्वांची होवो...हिच दिपावली शुभेच्छा...!!!

© राजीव दिवाण
२३ सप्टेंबर २०२५